بِسْمِ اللّٰہِ الرَّحْمٰنِ الرَّحِیْمِ نَحْمَدُہٗ وَنُصَلِّی عَلٰی رَسُوْلِہِ الْکَرِیْمِ وَعَلٰی عَبْدِہِ الْمَسِیْحِ الْمَوْعُوْد

لَا اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ مُحَمَّدٌ رَّسُوْلُ اللّٰہِ

دفتر مجلس انصار اللہ بھارت

Office Of The Majlis Ansarullah Bharat

Mohallah Ahmadiyya Qadian-143516, Distt.Gurdaspur (Punjab) INDIA

Mob.9682536974, E-Mail :ansarullah@qadian.in محلہ احمدیہ قادیان ۱۴۳۵۱۶ ضلع: گورداسپور (پنجاب)

# हजरत अपेक्षित मसीह व महदी (अ.स.) यांच्या विवेकपूर्ण उपदेशांद्वारे पवित्र कुरआनची प्रतिष्ठा, स्थान, दर्जा आणि महानता यांचे वर्णन

## बांगलादेश,पाकिस्तान आणि बुर्किनाफासोच्या अहमदींसाठी प्रार्थना करण्याचे उपदेश

सारांश प्रवचन खुतबा हजरत मिर्जा मसरूर अहमद, मसीहाचे पंचम खलीफा (अल्लाह त्यांचा सहाय्यक असो) दिनांक २४ मार्च २०२३, मशिद मुबारक, टिलफोर्ड यु.के.

أَشْهَدُ أَنْ لَا إِلٰهَ إِلَّا اللّٰهُ وَحْدَهُ لَا شَرِيْكَ لَهُ وَأَشْهَدُ أَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهُ وَرَسُوْلُهُ أَمَّا بَعْدُ فَأَعُوْذُ بِاللّٰهِ مِنَ الشَّيْطٰنِ الرَّجِيْمِ۔
بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ۔ اَلْحَمْدُ لِلّٰهِ رَبِّ الْعٰلَمِيْنَ۔ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ۔ مٰلِكِ يَوْمِ الدِّيْنِ۔ إِيَّاكَ نَعْبُدُ وَإِيَّاكَ
نَسْتَعِيْنُ۔ اِهْدِنَا الصِّرَاطَ الْمُسْتَقِيْمَ۔ صِرَاطَ الَّذِيْنَ أَنْعَمْتَ عَلَيْهِمْ غَيْرِ الْمَغْضُوْبِ عَلَيْهِمْ وَلَا الضَّآلِّيْنَ۔

तशहहूद, तआवुज, सुरह फातिहा नंतर हुजूर अनवर नी सुरह ‘अल् जुमा’ची आयत ३-४ पठन केले,

هُوَ الَّذِيْ بَعَثَ فِي الْأُمِّيِّيْنَ رَسُوْلًا مِّنْهُمْ يَتْلُوْ عَلَيْهِمْ آيَاتِهٖ وَيُزَكِّيْهِمْ وَيُعَلِّمُهُمُ الْكِتَابَ وَالْحِكْمَةَ وَإِنْ كَانُوْا مِنْ قَبْلُ لَفِيْ
ضَلَالٍ مُّبِيْنٍ۔ وَآخَرِيْنَ مِنْهُمْ لَمَّا يَلْحَقُوْا بِهِمْ وَهُوَ الْعَزِيْزُ الْحَكِيْمُ

आणि तद्नंतर म्हणालेः वरील आयतींचा अनुवाद याप्रकारे आहे,-तोच होय ज्याने निरक्षर (लोकां)मध्ये त्यांच्यामधूनच एक प्रेषित उभा केला आहे जो (तरीही) त्यांना त्यांची वचने ऐकवीत आहे, आणि त्यांना पवित्र करीत आहे, व त्यांना ग्रंथ आणि बुद्धिचातुर्याचे शिक्षण देत आहे, जरी ते यापूर्वी प्रत्यक्ष दिशाभूल झालेले होते; आणि त्यांच्यामधील अद्याप त्यांना येऊन मिळालेले नाहीत त्या लोकांच्या मध्ये (देखील). आणि तो सर्वशक्तिमान व बुद्धिवंत आहे.

२३ मार्च हा अहमदिया जमातमध्ये मसीह माऊद दिवस म्हणून ओळखला जातो. आम्ही भाग्यवान आहोत की अल्लाहने आम्हाला अपेक्षित मसीह व महदी (अ.स) यांना स्वीकारण्याची संधी दिली. २३ मार्च १८८९ इ. मध्ये हजरत अपेक्षित मसीह यांनी लुधियाना मध्ये दीक्षा स्वीकारुन श्रद्धावंतांची एक जमाअत स्थापित केली. मी पठन केलेल्या सुरह अल-जुमाच्या आयतीं मध्ये, पवित्र प्रेषितांच्या परमोच्च दासाच्या आगमनाची आणि त्यांच्याद्वारे एक जमाअत स्थापनेची शुभवार्ता देण्यात आली आहे. याशिवाय ही शुभवार्ता इतर आयात आणि हदीसद्वारे सिद्ध आहे. यावेळी, मी या वचनांचे स्पष्टीकरण आणि युगावतार मसीहच्या काळातील विविध चिन्हे अपेक्षित मसीहांच्या शब्दात वर्णन करेन. त्याचप्रमाणे त्यांनी ज्या घोषणा आणि दावे केले, तेही संक्षेप्त रूपात नमूद करेन.

सदरहू आयतींचे भाष्य करताना हजरत अपेक्षित मसीह फरमवितातः या श्लोकाचा सार असा आहे की परमेश्वर तो आहे जो आपल्या संदेष्टयाला अशा वेळी पाठवले जेव्हा लोक ज्ञान आणि विवेकापासून वंचित झाले होते. इस्लामिक कायद्याचे शास्त्र, ज्याद्वारे आत्मा परिपूर्ण होऊ शकतो

आणि मानवी आत्मा त्याच्या पूर्णतेपर्यंत पोहोचतो, ते पूर्णपणे नष्ट झाले होते. मग, अशा वेळी, सर्वशक्तिमान अल्लाहने आपला प्रेषित जो निरक्षर होता पाठवला आणि या प्रेषिताने त्यांचे आत्मे शुद्ध केले आणि त्यांना पुस्तक आणि बुद्धिचातुर्य ज्ञानाने भरले, म्हणजेच चिन्हे आणि चमत्कारांनी त्यांना पूर्ण खात्रीच्या पातळीवर आणले. पुढे ते म्हणालेः आणखी एक गट आहे जो शेवटच्या काळात प्रकट होईल, ते देखील अंधारात आणि चुकीच्या मार्गात गुरफटलेले असतील, नंतर अल्लाह त्यांचा मार्गदर्शन करेल आणि सोबत्यांच्या रंगातून सुशोभित करेल. त्यांचा प्रामाणिकपणा आणि विश्वास देखील सोबतींच्या प्रामाणिकपणा आणि विश्वासासारखा असेल. ही हदीस सांगत असताना पवित्र प्रेषित (स.) यांनी सलमान फारसीच्या खांद्यावर हात ठेवला आणि म्हणाले, ''जेव्हा पवित्र कुरआनाची शिकवण आणि श्रद्धा कृत्तिकापर्यंत दूर जाईल तेव्हा त्यास परत आणण्यासाठी अपेक्षित मसीह अवतरेल. हाच काळ अपेक्षित मसीहाचा काळ आहे. हाच तो पर्शियन मूळचा व्यक्ति आहे ज्याचे नाव अपेक्षित मसीह आहे.

पुढे म्हणालेः या श्लोकाचा अर्थ असा आहे की पूर्ण मार्गभ्रष्ट झाल्यानंतर, मार्गदर्शन आणि सद्सदविवेकबुद्धि मिळवणारे आणि पवित्र पैगंबरांचे चमत्कार आणि आशीर्वाद पाहणारे दोनच गट आहेत. पहिला साथीदारांचा आणि दुसरा गट जो साथीदारांसारखा आहे, तो अपेक्षित मसीहांचा गट आहे. कारण हा समूह पैगंबरांचे चमत्कारही पाहणारा आहे. आजकाल हेच घडत आहे. आणि तेराशे वर्षांनंतर पैगंबरांच्या चमत्कारांचे दरवाजे उघडले आहेत आणि लोकांनी स्वतःच्या डोळ्यांनी पाहिले आहे की रमजानमध्ये सूर्यग्रहण आणि चंद्रग्रहण, दारकुत्नीच्या हदीस आणि फतावा इब्नेहजर अनुसार दिसून आले. मग झुसिन्निन तारा, जो की महदी आणि मसीह च्यावेळी प्रकाशित झाले आणि ज्याला हजारो लोकांनी पाहिले आहे. तसेच जावा(स्थानात)झालेला ज्वालामुखी देखील हजारो लोकांनी पाहिले. त्याचप्रमाणे प्लेगचा प्रसार आणि हज्जपासून प्रतिबंध हे देखील सर्वांनी स्वतःच्या डोळ्यांनी पाहिले आहे. देशातील रेल्वेचा विकास आणि उंटांचे बेकार होणे, हे सर्व पैगंबर (स.) चे चमत्कार या काळात त्याचप्रकारे पाहिले गेले जसे प्रेषित मुहम्मद (स.) च्या सोबत्यांनी पाहिले होते. या मुळेच, सर्वशक्तिमान अल्लाहने या शेवटच्या गटाला 'मिनहुम' या शब्दाने संबोधले की ते देखील चमत्कारांच्या पाहण्याच्या दृष्टीकोनातून साथीदारांच्या रंगात आहेत.

आमची जमात अनेक प्रकारे सहाबा जमात सारखीच आहे. हे परमेश्वराचे चिन्हे आणि ताज्या सहाय्यतेपासून प्रकाश आणि श्रद्धा प्राप्त करतात ज्याप्रकारे सोबतींना प्राप्त करत होते. परमेश्वराच्या मार्गात, सोबत्यांसारखेच त्यांनी लोकांचे शिव्या-शाप, थट्टा, अपशब्द आणि बहिष्कार सहन करत आहेत. त्यांच्यापैकी असंख्य आहेत जे प्रार्थना करताना रडतात आणि प्रार्थनास्थळे अश्रूंनी ओले करतात. त्यांच्यापैकी बहुतेकांना सोबतींसारखे वही आणि संभाषण प्राप्त झाले. जशी ही जमाअत सोबतींसारखी आहे, तसेच या जमाअतचा इमाम पवित्र पैगंबर (स.) च्या गुणांमध्ये साधर्म्य आहे, जसे की स्वतः पवित्र पैगंबर (स.) महदीबद्दल हे गुणधर्म सांगितले होते की, तो माझा सारखा असेल. त्याच्या अस्तित्वात दोन समानता असतील, एक साम्य हजरत येशू मसीह (अ.स.) च्या अस्तित्वाशी आहे ज्यामुळे त्यांना मसीह म्हटले जाईल आणि दुसरे पैगंबर (स.) यांच्याशी साम्य आहे ज्यामुळे त्यांना महदी म्हटले जाईल.

आपल्या दाव्याबाबत ते म्हणतात की, सर्वशक्तिमान अल्लाहने जेव्हा जगाला तत्कालीन परिस्थितीत सर्व प्रकारची अनैतिकता, पाप-मत्सर यातून भरलेला पाहिला, तेव्हा त्याने मला सत्य आणि प्रबोधनाच्या प्रचारासाठी धाडले. आणि हा काळ असाही होता की लोक तेराशे हिजरी संपवून

चौदाव्या शतकाच्या सुरुवातीला पोहोचले होते, तेव्हा मी आदेशानुरुप सामान्य लोकांना जाहिरात व भाषणे देऊन असे उपदेश केले की या शतकामध्ये धर्माच्या सुधारणेसाठी ज्याने येणे अपेक्षित होते तो मीच आहे. ज्याद्वारे श्रद्धेची पुनर्स्थापना केली जाईल.

आपण अपेक्षित मसीह आहेत याचा पुरावा काय आहे? या संदर्भात ते सांगतात की, अपेक्षित मसीह ज्या काळात ज्या देशात आणि शहरात प्रकट होणे पवित्र कुरआन आणि हदीसद्वारे सिद्ध आहे, आणि विशेष कृतींना अपेक्षित मसीहाच्या आगमनाचे अस्सल कारण मानले गेले, आणि पृथ्वी व आकाशीय घटनांना अपेक्षित मसीहासाठी चिन्हे मानली गेली आणि ज्या ज्ञान आणि विवेकाला मसीहाचे गुण सांगितले गेले, त्या सर्व गोष्टी अल्लाहने माझ्यावर आणि माझ्या काळात माझ्या देशात जमा केल्या आहेत. या जमाअतच्या प्रगतीबाबत ते सांगतात की, तेवीस वर्षांपूर्वी ब्राहीन-ए-अहमदियामध्ये ही भविष्यवाणी नमूद आहे की, लोक ही जमाअत संपवण्याचे प्रयत्न करतील आणि (याकरिता) प्रत्येक षडयंत्र आणि कट रचण्याचा प्रयत्न करतील; परंतु अल्लाह सदैव या जमाअतची सहाय्यता करत राहील. हुजूर अनवर म्हणालेः आजही परमेश्वराची ती परंपरा सक्रिय आहे.

सर्वशक्तिमान अल्लाहने ब्राहीन-ए-अहमदियामध्ये हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) यांना सांगितले होते की, तुझ्या ओठांवर वक्तृत्व आणि तेजस्विताचे झरे वाहतील. या चिन्हाचा पुरावा म्हणजे त्यांची पुस्तके. समृद्ध अरबीभाषा मध्ये त्यांनी रचलेली अनेक पुस्तके हजारो रुपयांची बक्षिस म्हणून देण्याची घोषणा करुन प्रकाशित केली गेली परंतु एकही व्यक्ति स्पर्धेसाठी आली नाही.

प्रार्थनेच्या स्वीकृतीच्या लक्षणांबद्दल, हुजूर अन्वर यांनी अब्दुल करीम पुत्र अब्दुल रहमान नावाच्या विद्यार्थ्याचे उदाहरण दिले, जो हैदराबाद डेक्कनचा रहिवासी होता, जो कादियानमध्ये शिक्षणासाठी आला होता आणि त्याला एका पिसाटलेल्या कुत्र्याने चावला. शक्य ते सर्व उपचार करून पाहिल्यानंतर डॉक्टरांनी निराशा व्यक्त केल्यावर अशा स्थितीत हजरत अपेक्षित मसीहनी अत्यंत वेदनेने सर्वशक्तिमान अल्लाहच्या समीप प्रार्थना केली आणि त्यानिमित्ताने प्रार्थना स्वीकारण्याची विशेष अवस्थाही उपलब्ध झाली. आणि काही दिवसातच त्याची प्रकृती सुधरली आणि तो पूर्णपणे ठीक झाला.

हुजूर अनवर यांनी ईशसहाय्यतेच्या लक्षणांचा उल्लेख करताना डॉ. अलेक्झांडर डोई, गुलाम दस्तगीर कसुरी आणि चिराग दिन जमुनी यांची उदाहरणेही मांडली.

हुजूर अनवर म्हणाले, आज जर मुसलमानांना ही वस्तुस्थिती समजली की येणारा अपेक्षित व प्रतिक्षित मसीह व महदी आला आहे, आणि पवित्र प्रेषित (स.) यांचा तोच खराखुरा दास आहे आणि त्याला स्वीकारुन त्याची दीक्षा स्वीकारणे पवित्र पैगंबराच्या आदेशानुसार अत्यावश्यक आहे, तर मुस्लिम लोक पुन्हा जगात आपले वर्चस्व प्रस्थापित करतील, अन्यथा ते ज्या अवस्थेत आहेत तसेच राहतील.

हुजूर अनवर म्हणालेः रमजानच्या महिन्यात अहमदी लोक जिथे स्वतःसाठी प्रार्थना करत आहेत, तिथेच जमाअतला सर्व प्रकारच्या उपद्रवापासून सुरक्षित राहण्यासाठी प्रार्थना करावे, तसेच मुस्लिम उम्माहसाठीही प्रार्थना करा. अल्लाह त्यांचे डोळे उघडावे, त्यांना अंधारातून बाहेर काढावे आणि त्यांना हे समजावे की हजरत मिर्ज़ा गुलाम अहमद कादियानी हे अपेक्षित मसीह व प्रतिक्षित महदी आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांची जमाअत आहेत.

पाकिस्तानच्या अहमदींसाठी प्रार्थना करा आणि आपापल्या देशासाठी देखील प्रार्थना करा. तसेच पाकिस्तान मध्ये उद्भवणाऱ्या सर्व उपद्रव आणि अत्याचाराच्या दमनासाठी प्रार्थना करा. त्याचप्रमाणे बुर्किना फासोच्या अहमदींसाठी प्रार्थना करा. अल्लाह त्यांचे सर्व दुष्टप्रवत्ती लोकांपासून रक्षण करो. बांगलादेशातील अहमदींनासाठीही प्रार्थना करा. प्रत्येक शुक्रवारी एक नूतन प्रकारचा धोका निर्माण होत आहे.

जगभरातील अहमदींसाठी प्रार्थना करा. अल्लाह प्रत्येक अहमदीला प्रत्येक वाईटपासून वाचवो. आणि प्रत्येक अहमदीला स्थितप्रज्ञता प्रदान करे आणि विश्वासात वाढवावे.

जगाचा नाश होऊ नये म्हणूनही प्रार्थना करा. आजच्या घडामोडीवर निखून पाहिले गेले तर असे दिसते की जग आगीच्या उंबरठ्यावर उभे आहे. प्रत्यक्षपणे युद्धांकडेही त्याची वाटचाल सुरू आहे, यामुळे विनाशही येणार आहे आणि नैतिक दुष्प्रवृत्तीही टोकाला पोहोचल्या आहेत. आणि हे लोक ज्या प्रकारे अल्लाहला विसरत आहेत, हे अल्लाहचा क्रोध भडकवणारे बनू नयेत आणि परिणामस्वरूप त्यांच्यावर अल्लाहचा आक्रोश उजळू नये.

अल्लाह अहमदींना सर्व वाईटांपासून वाचवो. अहमदींना त्यांचे कर्तव्य आणि अधिकार पूर्ण करण्याचे सामर्थ्य देवो. आणि सर्व प्रकारच्या संकटांपासून त्यांचे रक्षण करो. (आमीन)

प्रवचनाच्या शेवटी, हुजूर अनवर यांनी अल-फजल इंटरनॅशनलचे दैनिक वृत्तपत्र म्हणून प्रकाशन करण्याची घोषणा केली आणि वाचकांना ते वाचण्यासाठी आणि विकत घेण्यास प्रोत्साहित केले.

اَلْحَمْدُ لِلّٰہِ! اَلْحَمْدُ لِلّٰہِ نَحْمَدُہٗ وَنَسْتَعِیْنُہٗ وَنَسْتَغْفِرُہٗ وَنُؤْمِنُ بِہٖ وَنَتَوَکَّلُ عَلَیْہِ وَنَعُوْذُ بِاللّٰہِ مِنْ شُرُوْرِ اَنْفُسِنَا وَمِنْ
سَیِّئَاتِ اَعْمَالِنَا مَنْ یَّھْدِہِ اللّٰہُ فَلَا مُضِلَّ لَہٗ وَمَنْ یُّضْلِلْہُ فَلَا ھَادِیَ لَہٗ وَنَشْھَدُ اَنْ لَّا اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ وَنَشْھَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُہٗ
وَرَسُوْلُہٗ، عِبَادَ اللّٰہِ رَحِمَکُمُ اللّٰہُ اِنَّ اللّٰہَ یَاْمُرُ بِالْعَدْلِ وَالْاِحْسَانِ وَاِیْتَآءِ ذِی الْقُرْبٰی وَیَنْھٰی عَنِ الْفَحْشَآءِ وَالْمُنْکَرِ وَالْبَغْیِ
یَعِظُکُمْ لَعَلَّکُمْ تَذَکَّرُوْنَ اُذْکُرُوا اللّٰہَ یَذْکُرْکُمْ وَادْعُوْہُ یَسْتَجِبْ لَکُمْ وَلَذِکْرُ اللّٰہِ اَکْبَرُ۔